# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई                                    दिनांक ०३.०८.२०२१

आंतरराज्यीय  मोटर कार चोरी करणारी सराईत गुन्हेगारांची टोळी नवी मुंबई गुन्हे शाखा कक्ष-१ कडून अटक. एकुण १३ मोटार कार (मारूती स्वीप्ट डिजायर, सियाज, हुंदाई I20, फॉर्चुनर,इनोव्हा ) असा एकुण ८१,८०,०००/- रु. मुद्देमाल हस्तगत  व  एकुण २४ गुन्हयांची उकल.

---

**१. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय- १४**
**२. ठाणे पोलीस आयुक्तालय- ०५**
**३. मिरा भाईंदर- ०२**
**४. मुंबई-०१**
**५. पिंपरी चिंचवड-१**
**६. राज्यस्थान १**
**अशा एकुण २४ गुन्हयाची उकल.**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात मोटार कार चोरी करण्या-या टोळीनी धुमाकुळ घातला होता. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये मोटार कार चोरी होण्याचे सत्र चालुच होते. त्यामुळे मा. पोलीस आयुक्त श्री. बिपीनकुमार सिंह, मा. सह. पोलीस आयुक्त  डॉ. श्री.जय जाधव व अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. श्री. बी.जे. शेखर पाटील यांनी गुन्हे शाखेतील अधिकारी व अमंलदार यांना विशेष मोहीम राबवुन मोटार कार चोरी करणा-या गुन्हेगारी टोळीच्या मुसक्या आवळुन वेळीच प्रतिबंध करण्याबाबत आदेशीत केले होते.

त्या अनुषगांने मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. प्रविणकुमार पाटील, मा. सहा. पोलीय आयुक्त (गुन्हे) श्री. विनोद चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा, कक्ष-१, नवी मुंबईचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल शिंदे यांनी गुन्हे शाखा-१ चे पथकासह मार्च २०२१ ते जून २०२१ या कालावधीत घडलेल्या मोटार कार चोरी गुन्हयाचे खारघर, रबाळे, नेरूळ एन.आर.आय. खांदेश्वर, तळोजा, सानपाडा पोलीस ठाणे हद्दीत चोरीस  गेलेल्या  मोटार कारचे घटनास्थळास भेटी देवून, सीसीटीव्ही फुटेज व उपलब्ध माहितीचे तांत्रिक विश्लेषण केले.,परंतु यश प्राप्त होत नव्हते.

१३ जून २०२१ रोजी सानपाडा पो. ठाणे येथे चोरीस गेलेल्या स्वीप्ट डिजायर कारचे घटनास्थळास पथकासह भेट देवून घटनास्थळी प्राप्त सीसीटीव्ही फुटेज पाहण्यास सुरुवात करुन दृढ निश्चय बनवुन आरोपिचा छडा लावण्या करीता मुंबई मेट्रोपॉलीटन भागातील ठाणे आयुक्तालयातील खडकपाडा, कल्याण,  चितळसर, ठाणे, मुंबई पोलीस आयुक्तालयातील बोरीवली व मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालयातील वसई या ठिकाणी मोटार वाहन चोरीचे गुन्हे दाखल होत असल्याची माहिती समोर आली असता सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे याचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,कक्ष-१ ची दोन तपास पथके १) वपोनि. सुनिल शिंदे, पोना/ शशीकांत जगदाळे, पोशि/ जालींदर गायकर २) सहा. पोलीस निरीक्षक हर्षल कदम, पोना/निलेश किंद्रे, पोना/भांगरे व पोशि/संतोष मिसाळ अशी तयार केली.

पथक-१ यांनी खडकपाडा, कल्याण, चितळसर पोलीस ठाणे हददीतील सीसीटीव्ही फुटेज, कल्याण डोंबिवली, ठाणे महानगरपालिका हददीतील पेट्रोल पंप व पुणे - मुंबई महामार्गावरील टोल नाक्यावरील महत्त्वाचे नाक्यावरील सीसीटीव्ही फुटेज पाहीली. तसेच पथक-२ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सीबीडी, एनआरआय, नेरूळ, सानपाडा, कळंबोली, उलवे,तळोजा परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहीली असता सर्व ठिकाणी वाहन चोरी करणारे गुन्हेगार हे एकच असल्याचे निर्दशनास आले असता आरोपी हे आज चोरलेली मोटार कार पुढील दोन-तीन दिवस इतर कार चोरी करण्यासाठी वापरत असत असेही निदर्शनास आले.

त्यानंतर कळंबोली परिसरात सीसीटीव्ही फुटेजद्धारे खडकपाडा येथील चोरीस गेलेले वाहन पार्क केले असल्याचे दिसल्याने दिनांक १६/०६/२०२१ ते दि. १९/०६/२०२१ दरम्यान सदर ठिकाणी गुन्हे शाखा,कक्ष-१ चे सर्व अधिकारी व अमंलदार यांनी अहोरात्र पाळत ठेवून वाहनास जीपीएस ट्रॅकर लावले परंतू आरोपी अटक करण्यात यश प्राप्त झाले नाही.

त्यानंतर पुन्हा उलवे येथे पिंपरी चिंचवड परिसरातील चोरीस गेलेले वाहन दिसून आल्याने पुन्हा दि. २६/०६/२०२१ ते दिनांक २८/०६/२०२१ या कालावधीत पाळत ठेवून प्राप्त केलेले जीपीएस ट्रॅकर लावले. आरोपी वाहन चोरी करण्यास निघाले असता वाहनाचा २ ते ३ किमी. पाठलाग करून सुध्दा आरोपी पकडण्यात यश प्राप्त झाले नाही.

त्यानंतर पुन्हा पथक दोन मधील सपोनि हर्षल कदम, पोना/निलेश किंद्रे, पोशि/संतोष मिसाळ यांनी सतत ८ दिवस उलवे परिसरात सीसीटीव्ही फुटेज पाहीली असता आरोपी हे वाहन चोरी करण्यासाठी टुरिस्ट कारचा वापर करीत असल्याचे तपासामध्ये निष्पन्न केले व पोना/निलेश किंद्रे हे उलवे परिसरात राहण्यास असल्याने त्यांनी नमूद वाहनाचा शोध घेवून सदरचे वाहन हे उलवे पसिरात पार्क असल्याची माहिती दिली असता, दिनांक ०९/०७/२०२१ रोजी सदर ठिकाणी दोन्ही पथक व गुन्हे शाखेचे इतर अंमलदार यांनी सापळा रचून वाहन चोरी करणारा मुख्य सुत्रधार आरोपी मोहम्मद तौफिक हबीबुल्ला यास शिताफीने अटक केली व त्याचा साथिदार मनोज गुप्ता यास लोढा हेवन सोसायटी, डोंबिवली येथून दिनांक ०९/०७/२०२१ रोजी शिताफीने अटक केली आहे.

**<u>अटक आरोपींची नावे -</u>**

१) मोहम्मद तौफिक हबीबुल्ला वय ४० वर्षे सध्या रा. रूम नं. २०१, गंगासागर सोसा. सेक्टर २३ उलवे नवी मुंबई मूळ रा. नरसिंगपूर पो. शितलागंज, थाना- कंधाई तहसील पटटी, जि. प्रतापगढ राज्य- उत्तरप्रदेश

२) मनोज राजेंद्र गुप्ता वय ३४ वर्षे रा. रूम नं. सी/००१, यमुना बिल्डींग, लोढा हेवन, निळजे गाव, डोंबिवली ईस्ट, ठाणे मूळ रा. ग्राम बरहजपार, पो. चिलवा थाना- गोलाबाजार, जि. गोरखपूर उत्तरप्रदेश.

**अटक आरोपी यांची गुन्हा करण्याची पध्दत:-**

आरोपीताकडे केलेल्या तपासामध्ये यातील मुख्य आरोपी मोहम्मद तौफिक हबीबुल्ला हा सराईत मोटार कार चोर असून तो पार्क असलेल्या कारचे दरवाज्याची काच तोडून दरवाजा उघडतो. त्यानंतर कारचे टूल बॉक्स ओपन करतो व डी.सी.एम. सॉकेट डिसकनेक्ट करतो. त्यानंतर कारचे बोनट ओपन करून सायरन नोड डिसकनेक्ट करतो व पुन्हा कारमध्ये जावुन ओ.सी.एम. सॉकेट बनवितो व पुन्हा खाली उतरुन एक्सटर्नल वायर ने बॅटरी ते फयुज बॉक्स जोडतो.त्यानंतर आधुनिक पध्दतीचा टॅब वापरून त्यास वायफाय कनेक्ट करून वाहनाच्या स्वीच ऑन/ऑफ की वर चावी ठेवून कोड ,डिकोड करतो व डुब्लीकेट चावी बनवितो व एक्सटर्नल नट बॉक्स व बॅट-या जोडलेली वायर काढतो व डुप्लीकेट चावीने गाडी चोरी करतो.

**नमूद तपासी पथकाने अथक परिश्रम करून अटक आरोपी यांचेकडून खालील कार हस्तगत केल्या असून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.**

१) सानपाडा पो. ठाणे, गु.र.क्र. ८८/२०२१ भादवि कलम ३७९

२) चितळसर पो. ठाणे, ठाणे शहर येथे गु.र.क्र.१३४/२०२१ भादवि कलम ३७९(हुंदाई आय-२० कार)

३) खांदेश्वर पो. ठाणे गु.र.क्र. १४६/२०२१ भादवि कलम ३७९ (मारुती इरिटीगा ZDI कार)

४) बोरीवली पो. ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ८६७/२०२१ भादवि कलम ३७९ (मारुती स्वीप्ट ZDI कार)

५) पिंपरी पो. ठाणे येथे गु.र.क्र. ४०९/२०२१ भादवि कलम ३७९ ( मारुती स्वीप्ट ZX+AMT कार)

६)माणिकपूर पो. ठाणे, वसई येथे गु.र.क्र. २४०/२०२१ भादवि कलम ३७९(मारुती CIAZ ALPHA कार)

७)खडकपाडा पो. ठाणे कल्याण येथे गु.र.क्र. १९७/२०२१ भादवि कलम ३७९ (मारुती Desire ZX+ कार)

८) सिबीडी पो. ठाणे गु.र.क्र. ४५/२०२१ भा.द.वि. कलम ३७९ (टोयाटो इनोव्हा कार)

९) रबाळे पो. ठाणे गु.र.क्र. २२०/२०२० भा.द.वि. कलम ३७९ (टोयाटो फॉर्चुनर कार)

**कक्ष १ चे अधिकारी व अंमलदार यानी अटक आरोपी यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करुन खालील नमुद गुन्हे उघडकीस आणले आहेत.**

१. खारघर पो. ठाणे गु.र.क्र. ४०२/२०१९ भा.द.वि. कलम ३७९ (मारुती सुझुकी स्विप्ट कार)
२. खारघर पो. ठाणे गु.र.क्र. ४०६/२०१९ भा.द.वि. कलम ३७९ (टोयाटो फॉर्चुनर कार)
३. खारघर पो. ठाणे गु.र.क्र. २१०/२०२१ भा.द.वि. कलम ३७९ (मारुती सुझुकी सियाज कार)
४. नेरूळ पो. ठाणे गु.र.क्र. ४८९/२०१९ भा.द.वि. कलम ३७९(मारुती सुझुकी स्वीप्ट डिजायर कार)
५. नेरूळ पो. ठाणे गु.र.क्र. ४८९/२०१९ भा.द.वि. कलम ३७९ (मारुती सुझुकी स्विप्ट डिजायर कार)
६. नेरूळ पो. ठाणे गु.र.क्र. ४७२/२०१९ भा.द.वि. कलम ३७९ (मारुती सुझुकी ब्रिझा कार)
७. एनआरआय पो. ठाणे गु.र.क्र. ३६९/२०१९ भा.द.वि. कलम ३७९(मारुती सुझुकी वॅगनर कार
८. एनआरआय पो. ठाणे गु.र.क्र. ७०/२०२१ भा.द.वि. कलम ३७९(टोयोटा इनोव्हा कार)
९. रबाळे गु.र.क्र. ११४/२०२१ भा.द.वि. कलम ३७९ (मारुती सुझुकी एक, सियाज कार व एक इरिटीगा कार)
१०. रबाळे पो. ठाणे गु.र.क्र. २३३/२०१९ भा.द.वि. कलम ३७९ (मारुती सुझुकी वॅगनर कार)
११. रामनगर, डोंबिवली पो. ठाणे गु.र.क्र. ३५६/२०२० भा.द.वि. कलम ३७९ (टोयाटो फॉर्चुनर कार)
१२. बदलापूर पूर्व पो. ठाणे, ठाणे गु.र.क्र. १०२/२०१९ भादवि कलम ३७९ (टोयाटो इनोव्हा कार)
१३. अर्नाळा, ठाणे पो. ठाणे गु.र.क्र. ०४/२०२० भा.द.वि. कलम ३७९
१४. भिवंडी शहर पो. ठाणे गु.र.क्र. २५०/२०१९ भा.द.वि. कलम ३७९ (मारुती सुझुकी वॅगनर कार)
१५. थानाई पोलीस ठाणे, राज्यस्थान गुरनं ४१६/२०१९ भादविक ३७९ (मारुती सुझुकी स्विप्ट डिजायर कार

**तसेच मोटर वाहन चोरी पथकाचे वपोनि. कोल्हटकर व सपोनि विजय चव्हाण व पथक यांनी नमुद आरोपिचा ताबा घेवुन आरोपीकडे कौशल्यपुर्ण तपास करुन खालील नमुद गुन्हयातील चोरीस गेलेल्या ४ मोटार कार किंमत रुपये १६,५०,०००/. ची मालमत्ता हस्तगत केली आहे**.

१. खारघर पो. ठाणे गुरनं. ४०२/२०१९ भा.द.वि. कलम ३७९(मारुती सुझुकी पांढ-या रंगाची स्वीप्ट कार)
२. नेरुळ पो. ठाणे गुरनं. ३८९/२०१९ भा.द.वि. कलम ३७९(मारुती सुझुकी पांढ-या रंगाची स्वीप्ट डिजायर कार)
३. नेरुळ पो. ठाणे गुरनं ७०/२०२१ भादविक ३७९ (टोयोटा सिल्वहर रंगाची इनोव्हा कार)
४. राज्यस्थान ठाणाई गुरनं ४१६/२०१९ भादविक ३७९ (मारुती सुझुकी स्विप्ट डिजायर कार)

**अटक आरोपी यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी**

**मुख्यआरोपी तौफिक हबीबुल्ला खान याची गुन्हेगारी पार्श्वभूमी**

**१.** काशीमीरा पो. ठाणे गुरनं । १३२७/२०१६ भादविक ३७९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०६, ३४

**२.** DCP CID MV.Cell Mumbai गुरनं । ६३/२०१० भादविक ३७९, ४६५, ४६७, ४६८, ४६९ ,४७१, ४२०,१२० (ब),३४

**३.** मानपाडा पोलीस ठाणे डोंबिवली गुरनं । ३१२/२०१४ भादविक ३७९,३४

**४.** मानपाडा पोलीस ठाणे डोंबिवली गुरनं । ५०९/२०१३/१६ भादविक ३७९,३४

**५.** कासार वडावली पोलीस ठाणे गुरनं । ११३८/२०१५ भादविक ३७९, ४११, ४२०,३४.

**६.** निजामपुरा पोलीस ठाणे गुरनं । ९०/२०१० भादविक ३७९, ३४

**७.** एनआरआय सागरी पोलीस ठाणे गुरनं । १७९/२०१४/२०१५ भादविक ३७९, ३४.

**८.** एनआरआय सागरी पोलीस ठाणे गुरनं । १८१/२०१४/२०१५ भादविक ३७९, ३४

**९.** खारघर पोलीस ठाणे गुरनं ३६९/२०१४/२०१५ भादविक ३७९, ३४

**१०.** चारकोप पोलीस ठाणे गुरनं । ४२७/२०१४ भादविक ३७९, ३४.

**११.** सीबीडी पोलीस ठाणे गुरनं । १५७/२०१४ भादविक ३७९.

**१२.** नालासोपारा पो. ठाणे गु.र.क्र. १२७/२०१३ भादवि कलम ३७९,३४

**१३.** सायन पो. ठाणे गु.र.क्र. ३६२/२०११ भादवि कलम ३७९,३४

**१४.** पलसाना पो. ठाणे, गुजरात गु.र.क्र. ११७/२०१४ भादवि कलम ३७९,११४

**१५.** आलेपड पो. ठाणे, गुजरात गु.र.क्र. ५७/२००३ भादवि कलम ३७९,११४

**.आरोपी मनोज गुप्ता याची गुन्हेगारी पार्श्वभूमी**

१. बोरीवली पो. ठाणे गु.र.क्र. ५२२/२०१९ भादवि कलम ३७९,३४

२. बोईसर पो. ठाणे गु.र.क्र. १५९/२०१४ भादवि कलम ४५७,३८०,५११

३. बदलापुर पुर्व पो.ठाणे गुरनं.१०२/२०१९ भादविक ३७९.

**सदरची कामगिरी गुन्हे शाखा,कक्ष-१ चे खालील तपास पथकाने महत्त्वपुर्ण भुमिका पार पाडलेली आहे.**

१) श्री. सुनिल शिंदे वरिष्ठ पोलीस निरीक्षक

२) हर्षल कदम सहा. पोलीस निरीक्षक

३) राजु तडवी सहा. पोलीस निरीक्षक

४)सहा. फौजदार भगवान तायडे

५)पोलीस हवा./ रोहीदास पाटील

६)पोलीस हवा. /बालाजी चव्हाण

७)पो.ना. निलेश किंद्रे

८)पो.ना. शशिकांत जगदाळे

९)पो.ना. दिपक मोरे

१०)पो.ना. अजय वाघ

११)मपोना. दिपाली सांवत

१२)पो.ना. रविंद्र सानप

१३)पो.ना. धनाजी भांगरे

१४)पोशि/ संतोष मिसाळ

१५)पोशि /गणेश कुटे.

१६)पोशि.जालींदर गायकर

१७)सहा. फौजदार (चालक) प्रदीप लिंगाळे

१८)पो.शि(चालक) राहुल गाढवे

--------------------